**<u>नि. फौ. खटला क्र.८६/२०१८</u>**

**<u>निशाणी क्र.३७</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०४ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : विलास बाबुराव सोनकांबळे,

**<u>वय</u>** : ३९ वर्षे, **<u>धंदा</u>** : शेती,

**<u>राहणार</u>** : जवळगा, ता. देवणी, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

मी आरोपींना ओळखतो. त्यापैकी किसन हा न्यायालयामध्ये हजर आहे आणि विजयप्रकाश आणि सुनिता हे गैरहजर आहेत. (अर्ज निशाणी ३६ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.१ आणि ३ च्या ओळखीचा वाद नसल्याने त्यांची गैरहजेरी माफ केलेली आहे.) दि.२२/०६/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सर्वे क्र.२६३ मध्ये घटना घडली होती. तिन्ही आरोपींनी त्यादिवशी मला बंधाऱ्यावर का पेरलास असे म्हणून शिवीगाळ व धक्काबुक्की केली. आरोपी विजयकुमारने कुऱ्हाड उचलली होती. साक्षीदार अब्दुल तुराब मसुलदार यांनी सोडवासोडव केली. त्यानंतर आमचे आपसात मिटले होते.

०२. त्यानंतर रात्री ९.३० वाजता तिन्ही आरोपी माझ्या घरात घुसले, मला शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्या व काठ्यांनी मारहाण केली. आरोपी विजयप्रकाश यांनी बाबू यांना डाव्या हातावर काठीने मारले. आरोपी किसनने माझी आई हारुबाईच्या डोक्यावर काठी मारून डोके फोडले होते. आता मला वस्तुचिन्ह अ वरील काठी दाखविली. ही तीच आहे. वैशाली सोनकांबळे हिने आरडाओरड केली. दशरथ पाटोळे, सोनू सोनकांबळे यांनी सोडवासोडव केली. त्यानंतर आम्ही रात्री १२.०० वाजता पोलीस ठाण्यामध्ये व त्यानंतर दवाखान्यामध्ये गेलो. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नव्हता.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपीकरिता विधीज्ञ उलटतपास श्री. एम.एस. नागराळे यांच्यामार्फत ::</u>**

०३. मला मराठी लिहिता व वाचता येते. आरोपी विजयप्रकाश हा माझा चुलत

चुलत भाऊ आहे. आरोपी किसन माझा सख्खा चुलत भाऊ आहे. आरोपी सुनिता ही माझी चुलती आहे. माझी जमीन सर्वे क्र.२६३/३ मध्ये आहे. त्यामधील १३ गुंठे जमीन महाराष्ट्र शासनाने संपादित केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर संपादन माझ्या वडिलांच्या नावे झाले होते आणि त्याची नुकसान भरपाई माझ्या वडिलांच्या नावे आली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी सदर पैसे घेतले होते. गंगारामला सर्वे क्र.२६३/३ मधील ३८ गुंठे जमीन मिळाली होती आणि माझ्या वडिलांना ३८ गुंठे जमीन मिळाली होती. सर्वे क्र.११५/५ मध्ये माझ्या वडिलांना ५६ गुंठे जमीन आणि गंगारामला ५६ गुंठे जमीन आली होती. सदर वाटण्या हालक्या भारी प्रतीच्या आधारे केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांना हालकी जमीन असल्याने जास्त जमीन मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी किसनने २२ गुंठे जमीन वामनला विकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर २२ गुंठयाची मोजणी करून ताबा दिलेला नव्हता. मला मोजणीची तारीख किंवा पंचांची नावे किंवा मोजणीदाराचे नाव सांगता येत नाही. माझा आरोपीसोबत सर्वे क्र.२६३/३ मधील जमिनीचा वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनीच्या हद्द कायम करण्याबाबत वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.२२/०६/२०१८ रोजी मी आणि माझ्या वडिलांनी आरोपी किसनच्या शेतात ट्रॅक्टरने पेरणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना त्यावेळी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मारहाणीच्या अनुषंगाने माझ्याविरुध्द फौजदारी प्रकरण सुरू आहे.

०४. अब्दुल तुराब मसुलदार हा नमूद घटनेच्या वेळी हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२/०६/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता घटना घडल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला शेतामध्ये धक्काबुक्की किंवा मारहाण केली नाही आणि शिवीगाळ केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला.

०५. माझ्या घरापासून आरोपी किसनचे घर १०० फूट अंतरावर आहे. त्यादरम्यान ईतरांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सर्व शेजारी रस्त्यावर थांबलेले होते. आरडाओरड झाल्यावर शेजारी जमा झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी

रात्री ९.३० वाजता माझ्या घरात घुसून मला शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्या व काठ्यांनी मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणीही सोडवासोडव केलेली नाही.

०६. सायंकाळी ६.३० पर्यंत वलांडी येथे जाण्यास बस आहे. आम्ही गाडी करून नमूद दिवशी वलांडी येथे गेलो होतो. गोकुळ गजबार यांची सदर गाडी होती. मी देवणी येथून जवळगा येथे गेलो नव्हतो. मला दवाखान्यातून सुट्टी मिळाल्यानंतर दि.११ रोजी मी जवळगा येथे गेलो होतो. दि.११ रोजी आमची सर्वांची तबियत व्यवस्थित होती. हे म्हणणे खरे आहे की, जवळगा येथील जमिनी काळ्या आणि भारी प्रतीच्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी किसनने माझ्या वडिलांना सामाईक जमिनी वेगळ्या करून घेण्याबाबत विनंती केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीमध्ये आमच्याकडे जास्तीचे रान निघते व त्यामुळे आम्ही खोटी केस केली आणि खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी विजयप्रकाश व ईतरांना केलेल्या मारहाणीमध्ये मला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वस्तूचिन्ह अ वरील काठीने मारहाण झाल्याचे मी खोटे सांगितले.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.
दि.२२/१२/२०२५.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.